## अधिसूचना

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-१७/०३/२०१५.

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८**

क्रमांक: एमएसए-०३/२०१५/प्र.क्र.४७/कामगार-१०, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई एकोणऐंशी) (यात यापुढे ज्याचा " उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) यांच्या कलम ४ च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याव्दारे, उक्त अधिनियमाच्या अनुसूची दोन मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

उक्त अधिनियमाच्या अनुसूची दोन मधील क्रमांक "६८५ " नंतर खालील नोंदीचा समावेश करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| "६८६ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदित सर्व **दुकाने.** | उक्त अधिनियमाच्या कलम १८ मधून खालील शर्तीच्या अधीन राहून:-<br>१) सदर सुट ही शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या **दिनांका पासून एक वर्षाच्या** कालावधी करिता लागू राहील.<br>२) प्रत्येक कामगार/कर्मचा-यास त्याच्या वेतनातून कुठल्याही प्रकारची कपात न करता आठवडयातून एक दिवस भरपगारी सुट्टी देण्यात यावी व सुट्टीसंबंधीचे प्रत्येक महिन्याचे वेळापत्रक सूचना फलकावर आगाऊ लावण्यात यावे.<br>३) प्रत्येक कामगार/कर्मचा-यास सलग पाच तास काम केल्यावर एक तासाची विश्रांती देण्यात यावी.<br>४) कामगार/कर्मचा-यास दररोज ९ तास किंवा आठवडयामध्ये ४८ तासापेक्षा जास्त काम करणे आवश्यक असणार नाही.<br>**५) कोणतेही दुकान रात्री १०.०० नंतर उघडे राहणार नाही.**<br>६) प्रत्येक कामगार / कर्मचा-यास कलम २५ नुसार ओळखपत्र देण्यात यावे.<br>७) दुकाने वर्षातील सर्व दिवस उघडी ठेवण्यास सूट देण्यात येत असल्याने आस्थापनेच्या वाढत असलेल्या व्यवसायाच्या प्रमाणात नवीन कर्मचारी |

नियुक्त करण्यात यावा.

८) महिला कामगार/कर्मचा-यांसाठी कामाच्या ठिकाणी स्वतंत्र लॉकर, सुरक्षा व विश्रांतीगृह यांची व्यवस्था करण्यात यावी.

९) महिला लैंगिक छळवाद प्रतिबंध करण्यासाठी तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात यावी.

**१०) महिला कामगार/कर्मचा-यांना रात्री ९.३० नंतर कामावर ठेवण्यात येवू नये.**

११) दुकानामध्ये बाल कामगार कामावर ठेवण्यात येवू नये.

१२) दुकानात कार्यरत कामगार / कर्मचा-यास संबंधित कामगार कायद्यांतील सर्व सुविधा देण्यात याव्यात

१३) दुकानात काम करणा-या कामगार/कर्मचा-यांकडून संमतीपत्र घेण्यात यावे व ते अभिलेख म्हणून जतन करण्या यावे.

१४) कोणत्याही कामगार/कर्मचा-यास त्याच्या अतिकालिक कामाबद्दल कलम ६३ मध्ये विहित केलेल्या दराने अधिक वेतन देण्यात यावे.

१५) कामगार/कर्मचा-यांची दररोजच्या कामाची व्याप्ती ११ तासापेक्षा जास्त असणार नाही.

१६) कामगार/कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय व सणाच्या सुट्टया वेतनासह देण्यात याव्यात.

१७) सदर सूट ही महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ पुरतीच मर्यादित आहे.

१८) वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त अधिनियमातील इतर तरतूदी आस्थापनेस यथास्थिती लागू राहतील.

१९) वरीलपैकी कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग झाल्यास व दुकाने निरिक्षकांना तसे आढळल्यास त्या दुकानास एक नोटीस देवून दिलेली सुट

रद्द करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सं.धो.डगळे)
कार्यासन अधिकारी

महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र भाग-१ एल मध्ये दिनांक १७ /०३/२०१५ मध्ये मुद्रित करण्यासाठी रवाना या अधिसूचनेच्या २० प्रती शासनास सादर कराव्यात व त्याच्या २० प्रती कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडे परस्पर पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर अधिसूचना व त्याचे इंग्रजी भाषांतर शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी सहसचिव (कामगार) यांनी मान्यता दिलेली आहे.

(सं.धो.डगळे)
कार्यासन अधिकारी

प्रत माहितीसाठी :-

१. कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा पूर्व, मुंबई-५१.
२. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महानगरपालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.
३. निवडनस्ती (कामगार-१०).

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy & Labour Department No. MSA-03/2015/CR47/Lab-10, dated 17 /03/2015 is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Balasaheb Kolase) 17/3/15
Joint Secretary to Government

**NOTIFICATION**

Industries, Energy & Labour Department,
Mantralaya, Mumbai – 400 032.
Dated the 17 /03/2015.

**Maharashtra Shops and Establishment Act, 1948**

No. MSA-03/2015/CR47/Lab-10, In exercise of the powers conferred by the proviso to Section 4 of the Maharashtra Shops and Establishment Act, 1948 (Bom.LXXIX of 1948) hereinafter referred to as the said Act the Government of Maharashtra hereby amends Schedule II of the said Act as follows, namely :

In Schedule II of the said Act, after entry "685" the following Entry shall be added namely;

| | | |
|---|---|---|
| "686 | All **shops** registered under Maharashtra Shops and Establishments Act, 1948. | Section 18 subject to the following conditions :<br>1) This exemption shall remain in operation for **the period of one year** from the date of Notification published in Govt. Gazette.<br>2) Every employee shall be given one day holiday in a week without making any deductions from his/her wages on account thereof and list of the time table of such holidays for a month shall be placed on the notice board in advance.<br>3) Every employee shall be given a rest period of one hour after 5 hours of continuous work.<br>4) No employee shall be required to work for more than 9 hours in a day or 48 hours in a week. |

5) **The shop shall not remain open after 10.00 pm on any day.**
6) Every employee shall be provided Identity Card, according to the Section 25.
7) As **shop** is given permission to keep open for all days, new staff shall be appointed for the extended timing.
8) Female employees shall be provided separate lockers, security and rest rooms at the work place.
9) Complaint redressal committee against sexual harassment of women should be established.
10) **Female employees will not be allowed to work after 9.30 p.m.**
11) No Child labour shall be permitted to work in the shop.
12) The employees shall be provided all the facilities mentioned in the concerned labour laws.
13) Consent letters shall be taken from the employees and it should be kept as record in the shop.
14) The employees shall be entitled to overtime wages in accordance with Section 63 of the said Act.
15) The spread over of an employee shall not exceed 11 hours in a day.
16) Employees shall be given national and festival holidays with wages.
17) This exemption is related only to Maharashtra Shops and Establishments Act, 1948.
18) In spite of these terms and conditions, all the provisions of this Act shall applicable to the establishment duly.
19) In case of violation of any of the above terms and conditions noticed by shop inspector the exemption shall be cancelled after giving notice to the shop.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

(S.D.Dagale)
Section Officer

To be published in the Maharashtra Government Gazette, Part I-L. Extra Ordinary, dated the 17 / 3 /2015 and to be returned with 20 copies of the print to Government and 20 copies of the print may be sent to the Commissioner of Labour, Mumbai, direct.

(S.D.Dagale)
Section Officer

**Copy to :**

1. The Commissioner of Labour, Bandra Kurla Complex, Bandra East, Mumbai – 51.
2. The Commissioner, Brihan Mumbai Municipal Corporation, Mahanagarpalika Marg, Mumbai – 400 001.
3. Select File (Lab-10).